भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ६४५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १६/०९/२०१७

**१) अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १२/०९/२०१७ चे १०.०० वा दर. यातील फिर्यादी ही ग्रामपंचायत सरपंच असुन ग्रा. पं. कार्यालयात सरपंचाची खुर्ची दिसली नाही. तेव्हा चपराशी यास विचारना केली असता, कार्यालयात पंचायत समिती सदस्या आरोपी क्र. १ व २ हे आले होते, त्यांनी सरपंचाची खुर्ची नको येथुन फेकुन दया असे म्हटल्याचे सांगितले तसेच ४ ते ५ दिवसा अगोदर फिर्यादी ही कार्यालयातुन घरी सायंकाळी ५.३० वा. दरम्यान जात असतांना यातील आरोपी क्र. १ व २ यांनी फिर्यादीस पाहुण अश्लिल शब्दात बोलले व शिवीगाळ करुन मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ५०९,५०६,५०४,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. आळे पो.स्टे जवाहरनगर हे करीत आहेत.

**२) अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन मारण्यास धावल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १५/०९/२०१७ चे ११.३० वा दर. यातील फिर्यादीचा भाचा सुशील वासनिक रा. बोरगाव हा पाहुणा म्हणुन घरी आला असता यातील आरोपी हा सार्वजनीक सिमेंट रोडवर येवुन फिर्यादी हिचेवर संशय घेवुन तो तुझा कशाचा भाचा आहे. वेश्या गिरीचा धंदा करण्यास आला आहे. असे बोलुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन मारण्यास धावल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट व ओपी धारगाव आकन्स क्र. ३०/१७ दिनांक १५/०९/२१०७ अन्वये पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २९४, ५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नवखरे पो.स्टे कारधा हे करीत आहेत.

**३) ट्रक चालकांच्या निष्काळजीपणामुळे मोटार सायकला धडक देवुन एकाचा मृत्यु . :–**

दिनांक १५/०९/२०१७ चे १३.०० वा दर. यातील फिर्यादी श्रीधर सेवकराम लांजेवार वय २७ वर्ष, रा. बोरी व त्याचे सोबत असलेला अंकुश भोदे हे रोहा येथुन स्व:गावी परत जात असता मोटार सायकल क्र. एमएच ३६ डी ४२२५ ही बाजुला उभी करुन लघवी करुन मोटार सायकल जवळ परत येत असतांना चारगाव कडुन येणाऱ्या यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन अंकुश महादेव भोदे वय २८ वर्ष, रा. बोरी यास धडक मारुन अपघात करुन त्याचे मरणास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम २७९,३०४(अ) भांदवि. सहकलम १८४, १३४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गेडाम पो.स्टे मोहाडी हे करीत आहेत.

**४) अंधारात आपले अस्तित्व लपवुन दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्येशाने मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १५/०९/२०१७ चे ०२.०० वा दर. यातील आरोपी हे कावळे ज्वेलर्स दुकाना जवळ अंधारात आपले अस्तित्व लपवुन दखलपात्र गुन्हया करण्याचा उद्येशाने मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोशि. लुटे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १२२(ख) मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. टेंभुर्णेकर पो.स्टे लाखनी हे करीत आहेत.

**५) औषधोपचारा दरम्यान महिलेचा मृत्यु . :—**

दिनांक १४/०९/२०१७ चे २१.१५ वा. दर. यातील मृतक जायत्राबाई सखाराम खंडाते वय ६० वर्ष, रा. पिपळगांव/माडगी हिची प्रकृती बरी नसल्याने तीला औषधोपचारा करीता सा. रु. भंडारा येथे वार्ड क्र. १६/१७ मध्ये भरती केले असता मृतक ही उपचारा दरम्यान दिनांक १४/०९/२०१७ चे २१.१५ वा. मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पो. स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी होमगार्ड रुपेश साठवणे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. सतांपे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**६) मृत अवस्थेत इसम मिळुन आला. :—**

दिनांक १५/०९/२०१७ चे १३.०० वा. दर. यातील मृतक वामन राजीराम लांजेवार वय ५५ वर्ष, रा. रामपुर हा आपले घरी मृत अवस्थेत मिळुन आल्याने फिर्यादी पवन वामन लांजेवार वय २० वर्ष, रा. रामपुर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. केवट पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक १५/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०५, तीन सिटर वाहनांवरती ०६ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ९८ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.८८०५६५७२६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.